प्रकरण दुसरे

# करा‍ड ग्रामीण भागातील नागरी समस्या

प्रकरण दुसरे

# कराड ग्रामीण भागातील नागरी समस्या

२.१ प्रस्तावना

२.२ कराड ग्रामीण भागातील लोकसंख्येची रचना व स्वरूप

२.३ कराड शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.४ कराड ग्रामीणचे भौगोलिक स्थान

२.५ कराड ग्रामीणमधील वस्त्या (वसाहती)

२.६ नागरीकरण व नगरपालिका तसेच शेजारील ग्रामपंचायत यांच्यातील वादाची कारणे.

२.७ कराड ग्रामीणचा उदय आणि विकास

२.८ कराड ग्रामीण भागाच्या नागरी समस्या

२.९ संदर्भ

## प्रकरण दुसरे

# कराड ग्रामीण भागातील नागरी समस्या

## २.१ प्रस्तावना -

कराड ग्रामीणचा अभ्यास करताना शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे किंवा एकूणच आधुनिक युगात संपूर्ण जग परिवर्तनाच्या वाटेवर असताना या परिवर्तनाच्या झंझावातात कराड ग्रामीणचा भाग नेमका कुठे आहे हे तपासणे ही कुतुहलाची बाब आहे. एकीकडे कराड शहर आधुनिकतेची अत्युच्च शिखरे पादाक्रांत करीत असताना कराड ग्रामीण मात्र १९ व्या, २० व्या शतकामध्ये असल्याची जाणीव व्हावी. इतक्या गैरसोई काही भागात आवासून उभ्या असलेल्या दिसतात. जागोजागी विद्रूपपणे उभ्या असलेल्या ओंगळ झोपडपट्टया, ऑक्सीडेशन पॉंडस च्या परिसरात असणाऱ्या नरकसमान वसाहती पाहताना या गोष्टीची प्राकर्षाने जाणिव हाते. कराड ग्रामीणचा अभ्यास करताना त्यामधील लोक हा महत्त्वाचा किंवा मध्यवर्ती घटक आहे. शहरीकरणाच्या वावटळीमध्ये आणि स्वतःला शहरीकरणाच्या प्रक्रियेचा अंग बनविण्याच्या प्रयत्नात किंबहुना शहरातील सर्व सुखवस्तू उपभोगण्याच्या अभिलाषेने आसूसलेल्या स्थलांतरीतांच्या जीवनाचे नरकात रूपांतर कधी झाले याची जाणिव सुद्धा त्यांना झाली नाही. परिणामतः गलिच्छ वस्त्या, दारिद्रय आणि बेकारीने भरकटलेली आणि त्यामुळे विविध गुन्हेगारी व अनैतिक व्यवसायांमध्ये गुंतलेल्या कुटुंबाचा जन्म या परिसरामध्ये झालेला आहे. या परिसराच्या विकासासाठी जबाबदार आणि अत्यावश्यक असलेल्या स्वयंशासनाच्या आणि प्रतिनिधीत्वाचा अभाव, अनियंत्रित आणि दिशाहीन ठरलेली मानवी मने या सर्वांचा परिपाक करार ग्रामीणच्या अधोगतीला आणि बकालपणास कारणीभूत ठरलेला दिसतो.

असंख्य झोपड्या व नागरी सुविधांचा अभाव त्यामुळे या परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. शिवाय सार्वजनिक शौचालये युनिट नसल्यामुळे उघड्यावरच विधी

उरकले जातात. त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तळीरामांची संख्या त्या ठिकाणी अधिक आहे. त्यामुळे वाद, मारामाऱ्या, भांडण असे प्रकार सुरू असतात. आंघोळ, कपडे, धुणी, भांडी घासणे हे रस्त्यावरच चालते. परिणामतः या परिसरात दलदल होवून दुर्गंधी पसरलेली आहे.[१] दैनिक पुढारीने सलग चार दिवस या परिसरातील प्रश्नावर अतिशय परखडपणे, सचित्र लिहिले आहे. यावरून या परिसरातील समस्यांच्या खोलीची जाणिव होते.

नागरी सुविधांचा अभाव, लोकसंख्येचे अयोग्य गुणोत्तर प्रमाण, स्वयंशास्त्राचा अभाव यातून दिवसेंदिवस या परिसरातील समस्या आणि जनजीवन अधिकाधिक धोकादायक बनत चालले आहे. या प्रकरणामध्ये कराड ग्रामीण भागातील लोकसंख्येची रचना स्वरूप तसेच ग्रामीण भागाच्या शहरीकरणाच्या समस्या या गोष्टींचा अभ्यास केलेला आहे.

## २.२ कराड शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी -

कराड ग्रामीण शहराचा अभ्यास करताना कराड शहराचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून मागोवा घेणे हे एक रोमांचक आणि उत्कंठा निर्माण करणारे कार्य आहे. कराड शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी अतिशय व्यापक आणि विशाल स्वरूपाची आहे. शहराची ऐतिहासिक माहिती लिखित स्वरूपात विविध ग्रंथ, बखरी, प्रवास वर्णने, ऐतिहासिक लेख, शिलालेख, नकाशे, ताम्रपट, सरकारी गॅझेटियर, तसेच विविध शोध निबंधामध्ये उपलब्ध आहे. ही कराडच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची जमेची बाजू होय. व्यापक प्रमाणात उपलब्ध असलेल्या या पुराव्यांमुळे संशोधकांना ती एक पर्वणीच ठरते.

कराड शहरातील अनेक लेखकांनीसुद्धा कराडच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर अनेक पुस्तके लिहून हा अनमोल ठेवा जपून ठेवला आहे. त्यापैकीच श्री. पी. डी. पाटील यांनी लिहिलेला "कराड शतसंवत्सरी स्मृती ग्रंथ", इंदिराबाई धोपाटे यांनी

लिहलेला "साहित्यीक कराड", यशवंत राजाराम गुप्ते यांचा "कराड" हा ग्रंथ तसेच कराड मुस्लिम जमाअत, कराड या स्वातंत्र्य सेनानी सत्कार समितीतर्फे युनूस अहमद कच्छी यांनी प्रकाशित केलेली "मौलाना अबूल कलाम ते डॉ. अब्दुल कलाम" ही स्मरणिका, तसेच २००३ साली कराड येथे पार पडलेले ७६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची स्मरणिका तसेच विविध वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होणारे ऐतिहासिक लेख, वर्णने, त्याचबरोबर कु. राजश्री शामराव पाटील यांचा "कराड नगरपालिकेचा इतिहास- १८५५ ते १९९३" हा शोध प्रबंध इ. विस्तृत आणि व्यापक पुराव्यातून कराड शहराचा शेकडो नव्हेतर हजारो वर्षाचा इतिहास लिखीत स्वरूपात उपलब्ध आहे. हे कराड शहराचे वैशिष्ट्य किंवा भाग्य म्हणावे लागेल.

इतिहासाच्या प्रवासात, कालौघात व बदलत्या काळानुसार कराड शहराने विविध नावे ल्यायली आहेत. कराहकडक, करहाटक, करहाकट, करहार, कलहर, कलहराबाद, कराराबद, कऱ्हाड, कराड व करड असे प्राचीन काळापासून आजपर्यंत 'क' नी सुरूवात होणाऱ्या अनेक नावांनी निरनिराळ्या शतकात प्रसिद्ध असलेल्या या गावात मुस्लिम समाजाची संख्या सुमारे एक चतुर्थांश आहे. तसेच कराड परिसराचा उल्लेख "बहुकोटा" असा करणेत आला आहे.

कराड शहराच्या नावाची उत्पत्ती स्पष्ट करताना कराड हे नाव कसे पडले हा मोठा वादग्रस्त मुद्या आहे. प्राचीन शिलालेखातून, ताम्रपटातून आणि महाभारत इ. महाकाव्यातून या शहराच्या नावाची करहाटक, करहाट, करहाकट, करहाकडक अशी रूपे आलेली आहेत. भूरूतय्या लेखात करहाकट व कुडय्याच्या लेण्यातील लेखात (इ.स. पूर्वी २०० ते इ.स. नंतर १००) करहाडक अशी नावे आलेली आहेत. कट याचा अर्थ कंबरपट्टा व नंतर लगतची दरी, सपाट प्रदेश, गाव असा होतो. करहाकड म्हणजे करहेच्या लगतची दरी किंवा सपाट मुलुख कदाचित पुरातन काळी कोयनेस व कृष्णेस 'केरा' च संबोधत असलेस नवल नाही. करेचे प्राचीन नाव करहा अथवा

कऱ्हा ही कदाचित असेल. करहा हे त्याकाळचे प्राकृत रूप असेल. केरा, करहा, कऱ्हा याचा कट यावरून त्याशहराचे कराड नाव रूढ होते असे संभवनीय आहे.

कराड शहर हे पूर्वीपासूनच शहर या संकल्पनेत मोडणारे गाव आहे. कराड शहरातील अंतर्गत किल्ले, गल्ल्या, वस्त्या, तटबंदी, बुरूजे, रस्ते इ. बाबतीत "मौलाना अबूल कलाम ते डॉ. अब्दुल कलाम" या स्मरणिकेत युनूस अहमद कच्छी यांनी "कराडमधील इस्लामिक संस्कृतीचा इतिहास व भूगोल" या लेखात खूप सूंदर वर्णन केलेले आहे. कराड शहर हा पूर्वी एक किल्लाच होता. या किल्ल्यातच लोक रहात होते व राज्यकर्ते मात्र किल्ल्याच्या वरच्या बाजूला भुईकोट किल्ल्यात रहात असत असे वर्णन सापडते.

कराड शहर आणि परिसरावर अनेक राजघराण्यांनी राज्य केले. आपल्या सत्ता निर्माण केल्याचा इतिहासात नोंद सापडते. मौर्य घराणे, सातवाहन, क्षत्रप, भोज, चालुक्य, राष्ट्रकूट, सिंद, शिलहार, यादव, बहामणी, अदिलशहा, मराठे, मोघल, पंतप्रतिनिधी इ. घराण्यांनी कराड शहरावर राज्य केल्याचे इतिहासात पुरावे सापडतात.

कराडच्या ऐतिहासिक जडणघडणीच्या काळातच कराड हे आर्थिक व व्यापारी केंद्र म्हणून उदयास येत होते. कराडमधून फिरताना किंवा इतिहासाची पाने उलटताना कराडच्या आर्थिक सामर्थ्याचे व ऐश्वर्याची अनेक उदाहरणे समोर येतात. इ.स. आधीचे एक शतक आणि त्यानंतरची तीन शतके अशा चारशे वर्षांच्या काळात भारतातील नागरी संस्कृतीची अर्थिक भरभराट झालेली दिसते. भारतातून कापड, मीरी इ. वस्तू निर्यात केल्या जाऊन त्यांच्या मोबदल्यात उंची, कडक रोमनमद्य, काच सामान, रोमन पुतळ्या इ. वस्तू इकडे येवू लागल्या. महाराष्ट्राच्या आसपास पश्चिम किनारपट्टीवर भरकच्छ, कल्याण, यासारखी बंदरे नालासोपारा, नाशिक, कराड, जुन्नर, कोल्हापूर हे व्यापारी आणि धार्मिक स्थळे होती. कराड हे पूर्वी पासून मोठे व्यापारी

केंद्र असल्याने व दाभोळमार्गे त्याचा परदेशी व्यवहार असल्याने हज यात्रेला जाणारे महाराष्ट्र, कर्नाटक भागातील मुस्लिम लोक कराड येथे जमून दाभोळमार्गे हजसाठी जात असत.

कराड प्रांतातील बावीस गावाची देशमुखी शहाजीस अदिलशहाने रणदुल्लाखानाच्या हाताखाली सन १६३८-३९ मोहिमेत उत्तम काम केल्याबद्दल दिली. शहाजीने आदिलशाही त्याग करताय ती झुंझारराव घाडगे यास मिळाली. १८५५ साली कराड शहर हे इंग्रजांच्या अंमलाखाली आल्यानंतर १५/९/१८५५ साली इंग्रजांनी कराड नगरपालिकेची स्थापना केली. आज कराड नगरपालिकेला १५० वर्षे होवून गेली आहेत.

कराड शहर आणि परिसराला अनेक दिग्गज नेत्यांनी नेतृत्व दिले आहे. कराड शहरापासून दिल्ली पर्यंत अनेक नामवंत आणि प्रतिभावान नेत्यांनी कराडचे प्रतिनिधित्व केले आहे. नागरिकांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष कै. रावबहादूर नारायण अनंत मुतालीक, १८८५, लोकनियुक्त सभासदांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष कै. रामचंद्र विष्णू ऊर्फ भाऊसाहेब भागवत, १८८६. तसेच मा. पी.डी. पाटील, हाजी अहमद कासम कच्छी, युनूस अहमद कच्छी, बादशहा अल्ली मुल्ला, अब्बास फरीद मुतवल्ली, यशवंतराव चव्हाण, आनंदराव चव्हाण, प्रेमलताताई चव्हाण, बाबूराव कोतवाल, पृथ्वीराज चव्हाण, शामराव आष्टेकर, बाळासाहेब पाटील, शारदाताई जाधव, आनंदरराव पाटील अशा अनेक नामवंत आणि प्रतिभासंपन्न अशा व्यक्तींचे नेतृत्व कराड नगरीला लाभले आहे.

## २.३ कराड ग्रामीणचे भौगोलिक स्थान -

कराड ग्रामीण म्हणजे कराड शहराच्या हद्दीबाहेर परंतु हद्दीला लागून वाढलेल्या उपनगरी वसाहती होय. या वसाहती कोणत्याही ग्रामपंचायत किंवा नगरपालिका हद्दीत नाहीत. या भागाला अनेक टोपण नावे आहेत. गुंठेवारी किंवा त्रिशंकू भाग असेही त्या भागाला म्हणतात.

कराड ग्रामीण मधील वसाहतींची वाढ सामान्यतः कराड शहराच्या दक्षिण, पूर्व, आग्नेय, इशान्य आणि नेऋत्येच्या काही भागात झालेली आहे. या भागालाच कराड ग्रामीण असे म्हणतात. कराड शहराच्या पश्चिम उत्तर आणि वायव्येस बारमाही वाहणाऱ्या कृष्णा व कोयना नद्या आहेत. त्यामुळे या भागात नैसर्गिकपणे शहर हद्दवाढीला मर्यादा पडलेल्या आहेत. कराड शहराच्या दक्षिणेस कार्वे नाक्यापर्यंत शहराची हद्द आहे. पुढे बार्शीग रस्त्यापासून गोळेश्वर ग्रामपंचायतीची हद्द सुरू होते. या हद्दीपासून कराड ग्रामीणची सुरूवात होवून ती कराडच्या उत्तरेस असलेल्या कृष्णा नदीच्या काठापर्यंत संपते. तसेच कराड शहराच्या दक्षिणेस असलेल्या बनपुरीकर कॉलनीपासून हुतात्मा पार्क पर्यंतचा भाग कराड ग्रामीणने व्यापलेला आहे.

## २.४ कराड (ग्रामीण) भागातील लोकसंख्येची रचना व स्वरूप -

कराड ग्रामीण मधील लोकसंख्या आणि क्षेत्रफळ यांची तुलना केल्यास ग्रामीणमध्ये घनदाट लोकसंख्या निर्माण झाल्याचे चित्र दिसते. तरीसुद्धा काही भागांमध्ये अतिशय घनदाट तर काही भागांमध्ये विरळ लोकसंख्येचे परस्पर विराधी चित्र दिसते. ज्या भागामध्ये नियोजित अशा कॉलन्या वसाहती जाणिवपूर्वक निर्माण केल्या आहेत त्या ठिकाणी लोकांची दाटी कमी दिसते. तसेच उच्चभू लोकांनी चांगल्या वसाहती निर्माण केल्या आहेत. उदा. शिवाजी हौसिंग सोसायटी, बनपूरीकर कॉलनी, रूक्मीणीनगर वगैरेचा भाग सोडला तर इतर ठिकाणी अतिशय घनदाट लोकवस्ती, अतिशय लहान घरे, झोपडपट्टया अशा स्वरूपाचे चित्र दिसते.

कराड ग्रामीण भागास वेगळे, स्वतंत्र तलाठी कार्यालय नाही. कराड शहर गाव कामगार तलाठी कार्यालयाकडेच त्या भागाचा कार्यभार असल्याने या परिसराची माहिती देखील याच कार्यालयाकडे उपलब्ध होते. कराड शहर गाव कामगार तलाठी कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या व तहसिलदार कार्यालयाच्या प्रशासनाकडून उपलब्ध

झालेल्या माहितीच्या आधारे तेथील भूमीचे क्षेत्रफळ, लोकसंख्येचे विश्लेषण अधिक चांगल्या प्रकारे करता येण्यासारखे आहे.

कराड ग्रामीण मध्ये अनेक वस्त्या, वसाहती आहेत. रूक्मिणी नगर, रूक्मिणी गार्डन, रूक्मिणी विहार, अशोक विहार, मैत्री पार्क, प्रकाशनगर, पी.डी.पाटील नगर, शिक्षक कॉलनी, सुर्यवंशी मळा, मुजावर कॉलनी, ऑक्सिडेशन पॉड्स (बारा डबरी), नगरपालिकेचे गांढूळ खत प्रकल्प परिसर, शरदनगर, खराडे कॉलनी, दौलतनगर, रेव्हेन्यू कॉलनी, रेठरेकर कॉलनी, सुमंगल नगर, कादरीय नगर, डवरी वस्ती, पोस्टल कॉलनी, बैल बझार, नेहरूनगर, बनपूरीकर कॉलनी, कोल्हापूर नाक्यापुढील परिसर, हुतात्मा स्मारक परिसर, रिमांड होम इ. वसाहतींचा समावेश कराड ग्रामीण भागात होतो. या सर्वच वसाहतींमध्ये कमी अधिक प्रमाणात लोकसंख्येची दाटी दिसून येते.

कराड ग्रामीणचे एकूण क्षेत्रफळ ११४७ हेक्टर म्हणजे साधारण २८६८ एकर एवढा प्रचंड विस्तार कराड ग्रामीणने व्यापलेला आहे. कराड शहराचे क्षेत्रफळ आणि कराड ग्रामीणच्या क्षेत्रफळाचा विचार केल्यास, कराड ग्रामीणचे क्षेत्रफळ अवाढव्य आणि व्यापक असल्याचे दिसते. लोकसंख्येची रचना पाहताना २००१ च्या जनगणनेनुसार कराड ग्रामीणची लोकसंख्या १५१६३ एवढी आहे. त्यामध्ये स्त्रियांची संख्या ७४२० एवढी तर पुरूषांची संख्या ७७४३ एवढी असलेली दिसते. वरील लोकसंख्येचे विश्लेषण केले असता साधारण ३२३ स्त्रिया कमी असल्याचे दिसते. लोकसंख्या जरी १५१६३ असली तरी ६८७१ एवढी मतदार संख्या असल्याचे दिसते. लोकसंख्येची वरील आकडेवारी २००१ च्या जनगणनेनुसार घेतलेली आहे. त्यानंतर आजअखेर साधारण सहा ते सात वर्षात कराड ग्रामीणमध्ये स्थलांतरीतांचे लोंढे वाढले असल्यामुळे स्थानिक आणि परप्रांतियांचे मिळुन साधारण ही लोकसंख्या २० ते २२ हजार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे कराड ग्रामीणच्या लोकसंख्येचे विश्लेषण करता येईल.

## २.५ कराड ग्रामीण मधील वस्त्या (वसाहती) -

रूक्मिणी नगर, रूक्मिणी गार्डन, रूक्मिणी विहार, अशोक विहार, पी. डी. पाटील नगर, मैत्रीपार्क, प्रकाशनगर, शिक्षक कॉलनी, सुर्यवंशी मळा, मुजावर कॉलनी, ऑक्सीडेशन पॉडस (१२ डबरी), गांढुळ खत प्रकल्प परिसर, शरद नगर, खराडे कॉलनी, दौलतनगर, रेव्हेन्यू कॉलनी, शाही वक्फ, कब्रस्थानचा काही भाग, शिवाजी स्टेडीयम, वेणूताई चव्हाण स्मारक, लिबर्टी मजदूर मंडळ, शिवाजी हौसिंग सोसायटी, सुमंगल नगर, कादरीय नगर, डवरी वस्ती, पोस्टल कॉलनी, शांतीनगर, त्रिमूर्ती कॉलनी, कार्वे नाका परिसर, बैल बझार, नेहरूनगर, बनपूरीकर कॉलनी, कोल्हापूर नाका, संगम हॉटेल, पंकज हॉटेल, रिमांड होम, हुतात्मा स्मारक इ. परिसर कराड ग्रामीणने व्यापलेला दिसून येतो.

## २.६ नागरीकरण व नगरपालिका तसेच शेजारील ग्रामपंचायत यांच्यातील वादाची कारणे -

कराड ग्रामीणचा अभ्यास करताना हा भाग आजअखेर अधांतरी किंवा त्रिशंकू कसा झाला व आजअखेर तो तसाच अवस्थेमध्ये पडून का आहे? याची कारणमीमांसा करणे अनिवार्य ठरते. आजचा जो कराड ग्रामीण म्हणून ओळखला जाणारा भाग आहे. तो कराड शहर हद्दीमध्ये समाविष्ठ व्हावा. या दृष्टीने कराड नगर परिषदेने भरपूर प्रयत्न केलेले दिसतात. अगदी १९६१ पासून कराडच्या या प्रश्नाचा पाठपुरावा केलेला दिसतो. सन १९६१ सालापासून कराड नगरपरिषद आपला हद्द वाढीसाठी प्रयत्नशील होती. कराडचे उत्तरेकडील मलकापूर सह काही भागांचा समावेश कराड हद्दीमध्ये होण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत आलेला होता. तसाच दक्षिणेकडील सैदापूर वगैरे गावांसह हद्दीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत आलेला होता.[२] कराड शहरालगत विखुरलेला व त्रिशंकू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कराड ग्रामीणचा पालिका हद्दीत समावेशाचा प्रस्ताव

शासन दरबारी अजूनही धुळ खात पडून आहे. कराड पंचायत समितीनेही या परिसरातील नऊ विभाग करून स्वतंत्र महसुली गावे निर्माण करण्याचा प्रस्तावालाही राजकीय दुर्लक्षामुळे वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत.

या गोष्टीवरून एक गोष्ट स्पष्ट जाणवते ती म्हणजे कराड ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा या भावनेने कराड नगरपरिषद व पंचायत समितीने आपापल्या परीने योग्य वेळी योग्य ते प्रयत्न केले. तथापि या प्रयत्नांना म्हणावे तेवढे यश मिळाले नाही. त्यामुळे अजूनही हा भाग अधांतरी राहिलेला आहे.

दरम्यानच्या कालखंडामध्ये मलकापूर ग्रामपंचायतीने मलकापूर नगर पंचायत स्थापनेचा प्रस्ताव सादर केला व हा प्रस्ताव शासनाने मान्य करून मलकापूर ग्रामपंचायतीचे नगर पंचायतीमध्ये रूपांतराबाबतची उद्‌घोषणा केली आणि त्याबाबत हरकती/सूचना मागविल्या त्यानुसार कराड नगर पालिकेने मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांचेकडे हरकत नोंदवली आहे व त्यानुसार या उद्‌घोषणेस स्थगिती मागितली आहे. त्यामुळे कराड ग्रामीण, नगरपालिका व मलकापूर ग्रामपंचायत यांच्यातील परस्पर वादाची कारणे स्पष्ट झाली.

कराड शहराच्या व ग्रामीणच्या लगत अनेक गावांच्या हद्दी आहेत. गोळेश्वर, कार्वे, गोटे, वारूंजी, सैदापूर, टेंभू, गोवारे इ. गावांच्या सीमा कराड ग्रामीणच्या हद्दीलगत आहेत. या सर्व गावांच्या हद्दी आणि कराड ग्रामीणची हद्द यांच्या बाबतीत एखादा अपवाद वगळता कोणताही वाद नाही. परंतु मलकापूर ग्रामपंचायतीने मात्र कराड हद्दवाढीसंबंधी अनेक हरकती उपस्थित केलेल्या आहेत.

१९७५ मध्ये कराड ग्रामीणचे विभाजन होवून मलकापूर व गोटे यांची निर्मिती झाली. उर्वरित काही भाग कराड ग्रामीणमध्ये राहिला.[४] दिर्घकाळ प्रलंबनानंतर प्रथम ५/३/१९७६ रोजी या हद्दवाढीची उद्‌घोषणा प्रसिद्ध झाली व हरकती/सूचना मागविण्यात आल्या. त्यासही काही वर्षे लोटली. या मध्यंतरीच्या काळात अनेक वर्षे

गेल्याने सन १९८७ साली पुन्हा दुसऱ्यांदा तीच उद्घोषणा नव्याने प्रसिद्ध झाली व हरकती/सुचना मागविण्यात आल्या. हरकती सुचनांची सुनावणी होऊन अखेरीस २०/६/१९८९ रोजी नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अंतिम अधिसूचना निर्गमीत करण्यात येऊन हद्दवाढीचा अमंलबजावणीची दि. २१ जुलै, १९८९ प्रसिद्ध करण्यात आली.

तथापि अंमलबजावणी पूर्वी हद्द वाढीमध्ये बाधीत होणाऱ्या मलकापूर ग्रामपंचायत, सैदापूर ग्रामपंचायत, बनवडी ग्रामपंचायत आणि विरवडे गावातील श्री. गोपाळ ज्ञानु धोकटे यांनी मा. नामदार उच्च न्यायालय यांचेकडे चार स्वतंत्र याचीका दाखल करून कराड नगरपरिषदेच्या हद्द वाढीच्या अधिसूचनेविरूद्ध स्थगिती प्राप्त करून घेतली.[५] दि. ४/४/१९९० रोजी कराड नगरपरिषद हद्द वाढीच्या अधिसूचनेस स्थगिती आदेश दिलेले आहे. सदर स्थगिती आदेशामध्ये शासनास पुन्हा संबंधीत हरकती/ सूचना धारकांना सुनावणी देवून पुढील निर्णय घेण्याची संधीही दिलेली होती. त्यानुसार त्यावेळचे नगरविकास खात्याने राज्यमंत्री ना. अरूण गुजराथी यांनी सर्कीट हाऊस, पुणे येथे सर्वांना सुनावणी दिली. सुनावणीचा निकालही जाहीर झाला. तथापि मध्येच मलकापूर 'क' वर्ग नगरपरिषद स्थापनेचा प्रस्ताव सादर केला गेला आणि कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीचा बोजवारा वाजला. अखेरीस कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीची सूचना आणि मलकापूर ग्रामपंचायत स्थापनेचा प्रस्ताव शासनानेएका अधिसूचनेनुसार रद्द केला.[६]

अशी विविध अडथळ्यांची शर्यत पार पाडत दमछाक झालेल्या नगरपरिषदेने व्यापक शहरहद्द वाढीचा नाद सोडून दिला. आणि कराड ग्रामीण म्हणून ओळखला जाणाऱ्या त्रिशंकू भागापुरताच मर्यादित हद्द वाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला. हा त्रिशंकू भाग कराड हद्दवाढीत समाविष्ट करण्याची कायदेशीर कारणेदेखील नगरपालिकेने स्पष्ट केली. हा भाग कराड नगरपरिषद हद्दीमध्ये लगत असल्याने त्या भागातील नागरिकांना लाईट, पाणी, रस्ते, ड्रेनेज या मुलभूत सुविधा नगरपरिषदेमार्फत दिल्या जात होत्याव आहेत असा नगरपरिषद हद्दी लगत असलेला त्रिशंकू भाग

नगरपरिषद हद्दीमध्ये तातडीने समाविष्ट करण्यात यावा असे शासनाचे परिपत्रक आहे.[७]

अशा प्रकारे मर्यादित कराड ग्रामीणचा भाग समाविष्ट करून शहर हद्द वाढीची घोषणा दि. ६/९/२००१ रोजी करण्यात आली. परंतु त्यावर मलकापूर ग्रामपंचायतीने हरकत उपस्थित केली व कराड ग्रामीणमधील ३९९, ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४१५, ४१६, ४१७, ४२१, ४२२, ४२३ असे एकूण १२ सर्व्हे नंबर हद्दवाढीमधून वगळावेत अशी हरकत घेतली. त्यावर सुनावणी होऊन कार्यवाही प्रलंबीत आहे.

दरम्यानच्या काळात मलकापूर नगरपंचायतीची उद्‌घोषणा झाली. सदर उद्‌घोषणेमध्ये वरील १२ सर्व्हे नंबरचा समावेश होता. वास्तविक पाहता वरील सर्व नंबर्स कराडचे असल्याचे ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद असताना मलकापूर नगरपंचायतीमध्ये समाविष्ट केले म्हणून कराड नगरपरिषदेने हरकत नगरपरिषदेने घेतल्याने सदर प्रश्न पुन्हा प्रलंबीत पडला आहे.

वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यास एक गोष्ट जाणवते ती म्हणजे कराड ग्रामीण नगरपरिषद शासनसंस्था यांच्यामध्ये कोणतेही विवाद मुद्दे नाहीत. उलट कराड नगरपरिषदेने वेळोवेळी सर्व प्रयत्न करून हा भाग कराड हद्दवाढीमध्ये समाविष्ट व्हावा यासाठी प्राथमिक प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर पंचायत समितीने देखील वेळोवेळी ठराव घेऊन या विभागाच्या विकासाला पूरक व पोषक धोरण स्वीकारले. परंतु शेजारील काही खेडी आणि मलकापूर ग्रामपंचायतीने वारंवार विविध अडचणी स्थगिती दिली. यामुळेच हा भाग अधांतरी राहिला असे जाणवते.

## २.७ कराड ग्रामीणचा उदय आणि विकास -

"कराड ग्रामीण" हा अधांतरी असलेला भाग कसा निर्माण झाला? या विषयी अनेकांच्या मनामध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. १९७५ साली कराड ग्रामीणचे

विभाजन झाले व मलकापूर आणि गोटे या स्वतंत्र महसूली ग्रामपंचायतींची निर्मिती झाली आणि त्यातून जो उर्वरीत भाग राहिला तो कराड ग्रामीण मध्ये राहिला.

या कराड ग्रामीणचा अभ्यास करताना हा भाग कोणत्याही ग्रामपंचायतीत समाविष्ट नाही. त्याचबरोबर नगरपालिकेच्या हद्दीत देखील नाही आणि तो समाविष्ट व्हावा म्हणून कोणते प्रयत्न व कोणी केले याचा थोडक्यात धांडोळा घेणे गरजेचे आहे.

कराड ग्रामीणचा त्रिशंकू भाग हा विविध सोई सवलतींनी वंचित आहे. त्यात राहणारे बहुतांश नागरीक कराड शहरातीलच आहेत. तो भाग कोणत्याच हद्दीत नसल्यामुळे तेथे विकासाला खीळ बसली आहे. त्या भागाचा सर्वांगीण विकास व्हावा ही प्रामाणिक भावना कराड नगरपरिषदेची आणि मलकापूर ग्रामपंचायतीची तसेच कराड पंचायत समितीचीदेखील आहे. हा भाग कराड नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये समाविष्ट व्हावा म्हणून नगरपालिका सन १९६१ पासून प्रयत्नशील आहे. तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत आला आहे. त्यानंतर ५/३२१९७६ रोजी शहर हद्दवाढीची उद्घोषणा झाली. शासनाने हरकती, सूचना मागविल्या. या प्रक्रियेत अनेक वर्षे निघून गेली आणि सन १९८७ साली पुन्हा तीच उद्घोषणा दुसऱ्यांदा झाली व हरकती, सूचना मागविणेत आल्या. या सर्व हरकती व सूचनांवर सुनावणी होऊन २०/६/१९८९ रोजी नगरपरिषदेच्या हद्दवाढीची अंतिम अधिसूचना निर्गमीत झाली आणि हद्दवाढीची अंमलबजावणी दि. २१ जुलै, १९८९ पासून प्रसिद्ध करण्यात आली.

या हद्दवाढीमुळे शेजारच्या ज्या ग्रामपंचायतींना बाधा पोहोचत होत्या त्या मलकापूर, ग्रामपंचायत, सैदापूर ग्रामपंचायत आणि बनवडी ग्रामपंचायत तसेच विरवडे येथील श्री. गोपाळ ज्ञानू धोकटे यांनी उच्च न्यायालयात चार स्वतंत्र याचिका दाखल केल्या आणि सदरच्या हद्दवाढीच्या घोषणेला न्यायालयाकडून स्थगिती मिळाली. त्यानुसार दि. ४/४/१९९० रोजी उच्च न्यायालयाने कराड नगरपरिषदेच्या हद्दवाढीस

स्थगिती आदेश दिला. या आदेशान्वये शासनाने पुन्हा संबंधितांकडून सूचना, हरकती मागवून पुढील निर्णय घेण्याची संधी दिलेली होती. त्यानुसार श्री. अरूण गुजराथी, नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी पुणे येथे सुनावणी घेतली. सर्वांच्या सूचना, हरकतींचा विचार करून निकाल दिला. दरम्यानच्या काळात मलकापूर ग्रामपंचायतीने मलकापूर 'क' वर्ग नगरपरिषदेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला. त्यामुळे कराड नगरपरिषदेच्या हद्द वाढीची अधिसूचना रद्द झाली व पुन्हा कराड ग्रामीण हा भाग अधांतरी आणि बेवारस बनला.

दरम्यानच्या कालखंडात असे अधांतरी आणि त्रिशंकू भाग हद्दीलगत असलेल्या नगरपरिषद हद्दीमध्ये तातडीने समाविष्ट करावेत असे परिपत्रक शासनाने काढले. नगरपालिकेने शहर हद्द वाढीचा फेर दुरूस्ती प्रस्ताव पाठवीलेलाच होता. त्यामुळे दि. ६/९/२००१ रोजी शहर हद्दवाढीची घोषणा करण्यात आली आणि त्यास संबंधीताकडून हरकती, सूचना मागविणेत आल्या. त्यास अनुसरून मलकापूर ग्रामपंचायतीने कराड हद्दीतील १२ सर्व्हे नंबर्स कराड हद्दवाढीतून वगळावेत अशी हरकत घेतली. ते सर्व्हे नंबर असे- ३९९, ४०६, ४०७, ४०८, ४०९,४१०, ४१५, ४१६, ४१७, ४२१, ४२२, ४२३ असे एकूण १२ नंबर्स आहेत. वास्तविक हे सर्व नंबर्स कराडच्या हद्दीतील व कराडच्या ७/१२ च्या उताऱ्यावर असताना सुद्धा मलकापूर ग्रामपंचायतीने हरकत घेतली. परंतू त्यावरील कार्यवाही अद्याप प्रलंबीत आहे. सदर मलकापूर ग्रामपंचायतीने घेतलेल्या हरकतींवर अजून निर्णय झालेला नसताना मलकापूर ग्रामपंचायतीचे "नगरपंचायतीत" रूपांतर करण्याची उद्‌घोषणा शासनाने केली. परंतु या उद्‌घोषणेमुळे बरेचसे नवीन प्रश्न जन्माला येत आहेत. पूर्वीचेच प्रलंबीत असलेले प्रश्न सुटलेले नसताना या नवीन उद्‌घोषणेमुळे कराड ग्रामीणचा प्रश्न अधिकच जटिल बनत चालला असल्यास नगरपालिकेच्या हरकतींवरून दिसून येते. कराड नगरपरिषदेने उपस्थित केलेले मुद्दे पुढीलप्रमाणे -

१. कराड ग्रामीण हा भाग एक स्वतंत्र भाग आहे. त्यामधील काही मोजके नंबर्स कराडमध्ये समाविष्ट करताना प्रथम त्याचे विभाजन करावे लागेल असे विभाजन करता येत नाही. अगर कोणत्याही भागातील अंशतः भाग तोडून तो सामील करता येणार नाही.

२. सन १९८९ साली मलकापूर ग्रामपंचायतीने दाखल केलेल्या याचिकेमधील प्रमुख मुद्दा, हरकती, सूचना यावर शासनाने सुनावणी दिली पाहिजे. अजून त्यावर निर्णय झालेला नाही.

३. कराड नगरपरिषद हद्दीमध्ये सामील होणाऱ्या कराड ग्रामीण या हद्दवाढ प्रस्तावाचा प्रथम निकाल लागणे आवश्यक आहे.

४. मलकापूर ग्रामपंचायतीच्या उद्घोषणेमध्ये कराड ग्रामीण मधील दर्शविलेले नंबर्स (१२ नंबर्स) वगळून मलकापूर नगरपंचायतीची उद्घोषणा केल्यास त्यास आमची हरकत नाही.[८]

वरीलप्रमाणे कराड नगरपालिकेने हरकत घेतल्यामुळे व त्यावर अजून कोणताच निर्णय झाला नसल्यामुळे कराड ग्रामीण हा भाग अजूनसुद्धा पूर्वीप्रमाणेच त्रिशंकू व अधांतरी राहिलेला आहे.

दरम्यानच्या काळात कराड पंचायत समितीने देखील या भागाच्या हालअपेष्टा बघून त्यावर मार्ग काढणेचा प्रयत्न केला. कराड पंचायत समितीने कराड ग्रामीणमधील भाग नागरी सोई सुविधांपासून वंचित आहे. या भागात प्रचंड गैरसोय आहेत. त्या भागाला न्याय मिळावा, विकास व्हावा, विविध शासकीय योजनेतून नागरिकांना सोई सुविधा उपलब्ध व्हाव्यात या भावनेने प्रयत्न केले. कराड पंचायत समितीमध्ये २५ जुलै, १९९६ रोजी मासिक सभेत एक ठराव पारीत केला. त्यानुसार या विभागातील नेहरूनगर कार्वे नाक्याचा पश्चिम व पूर्व भाग, त्रिमूर्ती कॉलनी, उदय कॉलनी, प्रियदर्शनी कॉलनी, १२ डबरी वसाहत, सुसराळ नगर, बनपूरीकर कॉलनी

अशा नऊ विभागांना स्वतंत्र महसुली गावाचा दर्जा मिळावा असा ठराव पारीत केला. त्यानंतर हाच ठराव पुन्हा एकवेळ २५ जून, १९९७ रोजी मंजूर करण्यात आला. वास्तविक पाहता कराड पंचायत समितीने केलेला हा ठराव देखील कराड ग्रामीणच्या दृष्टीने अतिशय फायद्याचा होता. परंतु हा ठराव पंचायत समितीने दोन वेळा संमत करून देखील त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. परिणामतः कराड नगरपालिकेचा शहर हद्दवाढीचा प्रस्ताव, मलकापूर ग्रामपंचायतीची उद्घोषणा, कराड पंचायत समितीचा ठराव, या सर्व घडामोडींमध्ये कराड ग्रामीणचा भाग मात्र अधांतरी, त्रिशंकू अवस्थेत राहिला आहे हे एक प्रांजळ सत्य आहे.

कराड ग्रामीणमधील वाढत्या वसाहतींचा मागोवा घेतल्यास या वसाहतींचा निर्माण होण्यास अनेक गोष्टी, घडामोडी व परिस्थिती कारणीभूत ठरल्या आहेत. असे दिसते. सर्वात पहिले आणि महत्त्वाचे कारण म्हणजे कराड शहराचे अतिशय मर्यादित क्षेत्रफळ होय. निव्वळ २$^{१}/_{२}$ चौ.कि.मी. एवढीच शहराच्या हद्दीची व्यापकता आहे. बदलत्या काळानुसार वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यास कराड शहराची भूमी, हद्द असमर्थ ठरली. वाढती लोकसंख्या, निवास स्थानांची मर्यादित उपलब्धता आणि त्यातून आकाशाला भिडणाऱ्या इमारती आणि घरांच्या किंमती, या समिकरणात मध्यम वर्गियांना स्वतःचे घर गरीबांना परवडेल अशी भाड्याची खोली श्रीमंताला साजेसा ऐसपैस बंगला कोठेच दिसेना. मध्यमवर्गीयांना त्यांच्या उत्पन्नात परवडेल असे घर, श्रीमंतांना हवा असलेला ऐसपैस बंगला बांधण्यासाठी आवश्यक असलेली जमीन कराड शहरात उपलब्ध होऊ शकत नसल्यानेच अशा लोकांनी कराड शहराच्या हद्दीबाहेर मिळतील तशा शेतजमिनी विकत घेऊन घरे, बंगले बांधण्यात सुरूवात केली. गरीबींकडून मध्यमवर्गाकडे वाटचाल करणाऱ्या नवमध्यम वर्गीय आणि नवश्रीमंतांना देखील स्तःचे घर असावे अशी अभिलाषा निर्माण होणे नैसर्गिकच होते. त्यातूनच शेतजमिनी विकत घेऊन घरे बांधण्याचा प्रघातच पडत गेला याच दरम्यान काही लोकांनी शेतजमिनी बिगरशेती (अकृषक) करून सुरेख नियोजित अशा

कॉलन्या देखील स्थापन केल्या. उदा. शिक्षक कॉलनी, शिवाजी हौसींग सोसायटी, प्रकाशनगर, रूक्मिणी नगर इ.

दुसरे आणखी एक कारण म्हणजे कराड शहर हे शैक्षणिकदृष्ट्या विकसित होत गेलेले आहे. कराड शहर आणि परिसरात विविध शिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृहे स्थापन झालेली आहेत. त्यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, इंजिनिअरींग, फार्मसी, मेडीकल कॉलेज, आय.टी.आय., मुक्त विद्यापीठ, खाजगी व सरकारी तांत्रिक ज्ञान देणाऱ्या टेक्निकल इन्स्टीट्यूट, लॉ व मॅनेजमेंट कॉलेज, प्रेमलाताई पॉलिटेक्नीक, संगणक ज्ञान देणाऱ्या खाजगी संस्था, महिला महाविद्यालये व महिला वसतीगृहे आणि त्या अनुशंगाने उपलब्ध असणारे दर्जेदार खाजगी शिकवणी वर्ग व कोचिंग क्लासेस या सर्व शैक्षणिक शाखा आणि सुविधा उपलब्ध होत गेल्यामुळे त्या शाखेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हे शिक्षण घेण्यासाठी तालुका, जिल्हा तसेच संपूर्ण देशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मिळणारे बक्कळ भाडे (मूँह मांगे दाम) त्यामुळे सामान्य आणि गरिबांना परवडेल अशी भाड्याने घरे मिळणे अशक्य झाले ही गरज लक्षात घेऊन काहींनी कराड ग्रामीण भागात जमिनी घेऊन कशाबशा खोल्या बांधून भाड्याने देण्याचा धंदा चालू केला. अशाच खोल्यामधून वरील ठिकाणी शिकणारे विद्यार्थी देखील रहावयास येऊ लागल्याने या वसाहतींचा आकार हळूहळू वाढू लागला.

कराड शहर आणि परिसर जसा शैक्षणिक दृष्टया संपन्न आहे तसेच औद्योगिकदृष्ट्या देखील समृद्ध आहे. उद्योगधंदे, कारखानदारी, लघुउद्योग असे औद्योगिकरणाचे व्यापक स्वरूप येथे पहायला मिळते. कराड शहराच्या आसपास तीन औद्योगिक वसाहती आहेत. मलकापूर येथील कोयना औद्योगिक वसाहत, ओगलेवाडी जवळील इंडस्ट्रीयल एरीया व कराड या एम.आय.डी.सी. अशा तीन औद्योगिक वसाहती येथे आहेत. त्याचबरोबर किर्लोस्कर कोपलँड, महिला उद्योग, जवळच असणारे कृष्णा सहकारी साखर कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, डायमंड

शुगर वर्क्स तसेच या सर्व उद्योगांवर चालणारी लघु उद्योग धंदे, त्याचबरोबर सिमेंट वस्तू उत्पादन व बांधकाम व्यवसाय, शेती उत्पन्न बाजार समिती व आडत दुकाने, त्यातील होलसेल बाजार, संपन्न अशी कापड बाजारपेठ यामध्ये गुरूवारपेठ मेनरोड वरील व टिळक रोडवरील कापडपेठ शिवाजी मार्केट मधील कापड बाजार त्याचबरोबर टिंबर व्यवसाय, वखारी मोठ्या प्रमाणात आहेत. शामराव पाटील फळे व भाजीपाला मार्केट मध्ये दररोज होलसेलमध्ये फळे व भाजीपाला खरेदी विक्री चालते. अशी औद्योगिक संपन्नता निर्माण करणारी औद्योगिक व्यापारी संस्थाने कराडमध्ये अस्तित्वात आहेत. या सर्व उद्योगांना मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने कराड शहर व परिसर एवढेच नव्हे तर संपूर्ण भारतातून, विविध प्रांतातून उपजिविकेसाठी माणसे कराडमध्ये येऊन राहत आहेत. एवढ्या सर्व लोकांना राहण्याची सुविधा निव्वळ कराड शहरामध्ये उपलब्ध होणे अशक्यप्राय झाले आहे. त्यामुळेच या समस्येवर मार्ग काढण्यासाठी लोक कराड शहर हद्दीबाहेर शेतजमिनीत घरे आणि वसाहतो बसू लागली आणि त्यातुनच कराड ग्रामीणच्या उदयास चालना मिळाली.

कराड ग्रामीणच्या उदयाला कारणीभूत ठरलेले आणखी काही कारणे आहेत. त्यापैकी बांधकाम व्यवसाय देखील फोफावलेला आहे. या दोन्ही व्यवसायात मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आवश्यक असते. या व्यवसायामध्ये कुशल, अर्धकुशल, अकुशल अशा प्रकारचे कामगार आवश्यक असतात. त्यामुळे परप्रांतातून आलेले अनेक लोक या व्यवसायात सामावलेले आहेत. त्यांचा आर्थिक दर्जा खालावलेला असल्याने कराड ग्रामीणमधील वस्त्यांमध्ये त्यांचा रहिवास दिसतो. कराड आणि परिसरामध्ये साध्या हॉटेलापासून थ्री स्टार हॉटेलापर्यंत सर्व प्रकारची हॉटेल्स, लॉजींग बिअरबार, परमीट रूम, ढाबे, खानावळ्या हादेखील व्यवसाय मोठ्या प्रमाणावर असल्याने त्या व्यवसायात देखील बहुतांशी बाहरचे लोक दिसतात व त्याची राहण्याची सोय त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार कराड ग्रामीणमध्ये झालेली आहे.

कराड शहरावरून नॅशनल हायवे नं.४ जातो. तसेच सेंट्रल रेल्वेचे रेल्वेस्थानक सुसज्य एस.टी. आगार, विमानतळ, खाजगी प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय या सर्व प्रवासाच्या सुविधा कराडमध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे कराड शहर हे वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत सोईचे ठिकाण आहे. परिणामी कराडच्या आसपास राहणारी खेड्यातील माणसे कराडला राहणे पसंत करतात व कराड शहरात राहणेची सोय होत नसल्याने कराड ग्रामीणकडे वळताना दिसतात.

कराडमध्ये वैद्यकीय व्यवसाय हा एक महत्त्वाचा व्यवसाय बनला आहे. कराडला "विद्यानगरी" बरोबरच "आरोग्यनगरी" म्हणावे, एवढ्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. सर्व प्रकारची दवाखाने आणि वैद्यकीय उपचार उपलब्ध आहेत. सौ.वेणूताई चव्हाण, जिल्हा उपरूग्णालय महाकाय कृष्णा रूग्णालय, तसेच खाजगी आणि सहकारी रूग्णालये उपलब्ध आहेत. या दवाखान्यामध्ये तपासणी ऑपरेशन्स पासून अतिदक्षता विभागापर्यंत सर्व सुविधा उपलब्ध आहेत. कृष्णा रूग्णालयामध्य कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावर उपचार करण्यासाठी "कोबाल्ट युनिट" उपलब्ध आहेत. औषधाची दुकान आणि लॅबोरेटरीज अशा सर्व प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय सेवा, सवलती उपलब्ध असल्याने त्याला लागणारी मनुष्यबळाची उपलब्धता ही कराड ग्रामीणची लोकसंख्या वाढविण्यास कारणीभूत ठरलेला घटक आहे. त्यामध्ये देखील परप्रांतीय आणि जवळपासच्या खेड्यापाड्यांतील लोक दिसतात. त्यांचा देखील रहिवास कराड ग्रामीण मध्ये बहुतांश प्रमाणात दिसतो.

कराड ग्रामीणचा उदय आणि विकास कसा झाला याचा अभ्यास करताना कराडमध्ये शासकीय कार्यालये हा घटक दुर्लक्षीत करता येणार नाही. कराड हे तालुक्याचे ठिकाण आहे. तालुका पातळीवरील सर्व शासकीय व प्रशासकीय कार्यालयाबरोबरच जिल्हा पातळीवरील देखील काही कार्यालये उपलब्ध आहेत. त्यामध्ये वेणूताई चव्हाण जिल्हा उपरूग्णालय सहाय्यक जिल्हाधिकारी (प्रांत) कार्यालय, जिल्हा निबंधक कार्यालय, जिल्हा प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंढे व

ओगलेवाडी येथील वीज वितरण कार्यालये, जिल्हा न्यायालय, त्याचप्रमाणे पतसंस्था, सहकारी, राष्ट्रीय बँका आणि या सर्व कार्यालयांबरोबर येणारा कर्मचारी वर्ग आणि त्यांच्या राहण्याची सोय हा कराड शहरामधील न सुटलेला गंभीर प्रश्न त्यातूनच मार्ग काढण्यासाठी लोकांनी कराड ग्रामीणकडे आपला मोर्चा वळविला.

कराड शहरात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. अनेक जाती धर्माचे, भाषेचे, पंथाचे लोक आजमितीस कराड शहरात राहताना दिसतात. त्या त्या धर्माची पवित्र प्रार्थनास्थळे, ऐतिहासिक वास्तू इत्यादी ठिकाणे आहेत. कृष्णा व कोयना नद्यांचा संगम, कृष्णाबाईचे मंदिर, प्रशस्त घाट व परिसरातील मंदिरे, शाही कब्रस्थान, खोजे लोकांची मशिद, चर्च इत्यादी अशी अनेक प्रार्थनास्थळे या ठिकाणी आहेत. त्यामुळे विविध धर्मीयांचे धर्माचरणाची गरज भागविण्याच्या दृष्टीने कराड शहर हे अत्यंत सोईचे आहे. हे देखील एक कारण कराड ग्रामीणच्या उदयास कारणीभूत ठरताना दिसते.

मानवाचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला असता. माणूस हा नेहमी सुपिक, सधन व संपन्न अशा प्रदेशातच आपल्या वसाहती निर्माण करतो. हा मानवाचा नैसर्गिक गुण आहे. त्या दृष्टीने पाहिल्यास कराड शहर हे कृष्णा व कोयना या बारमाही वाहणाऱ्या दोन मोठ्या नद्यांच्या काठावर वसलेले गाव आहे. पाण्याची मुबलक उपलब्धता, सुपीक जमिनी, अन्नधान्याचे भरपूर उत्पन्न, आर्थिक सुबत्ता, यामुळे हा परिसर सधन आणि समृद्ध बनला. त्यामुळे कराड हे आसपासच्या लोकांबरोबरच परप्रांतीयांचे देखील आकर्षण बनले. त्यामुळे साहजिकच लोकांचे लोंढे कराड शहराकडे वाढले. कराड शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांना राहता येणे अशक्य झाले. दरम्यान कराड शहराच्या हद्दवाढीसाठी प्रयत्न झाले. परंतु त्यातून कराड शहराची हद्दवाढ झाली नाही. पर्यायाने कराड ग्रामीणच्या निर्मितीस चालना मिळाली.

## २.८ कराड ग्रामीण भागाच्या नागरी समस्या -

### अ. स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभाव (स्वयंशासनाचा अभाव) -

परिसर कोणताही असो त्याच्या विकासाकरिता अत्यंत आवश्यक घटक असतो. तो म्हणजे स्थानिक संस्था किंवा नागरी स्वयंशासन होय आणि नेमका हाच घटक कराड ग्रामीणमध्ये उपलब्ध नसल्याने कराड ग्रामीणची परिस्थिती दिवसेंदिवस घसरत चाललेली आहे. कराड ग्रामीण हा भाग कराड नगर पालिकेच्या हद्दीबाहेर आहे. तसेच तो भाग लगतच्या कोणत्याही ग्रामपंचायतीच्या हद्दीत नाही. त्यामुळे भागाच्या विकासाला जबाबदार असणारी कोणतीही स्वयंशासीत यंत्रणा येथे अस्तित्वात नाही. कराड ग्रामीण हा पूर्णपणे त्रिशंकू अवस्थेत आहे. हा भाग ना कोणत्याही ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे, ना नगरपरिषद हद्दीमध्ये आहे.[९] हा परिसर कोणत्याही स्वयंशासनाच्या हद्दीत नसल्यामुळे कोणाचेही कसलेही नियोजन आणि नियंत्रण यापरिसरावर नाही. परिणामी अनियंत्रित, बकाल वस्त्यांचे माहेरघर म्हणून कराड ग्रामीणकडे पाहिले जाते. परिसराच्या विकासासाठी विकास योजना शासन दरबारी कोणत्या आहेत हे जरी माहीत असले तरी त्याचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रे या भागातील नागरिकांना उपलब्ध होत नाहीत. रहिवासी दाखल, आठ 'अ' चा उतारा, यासह महत्त्वाची कागदपत्रे, काढणे मुश्किल झाल्याने इंदिरा आवास योजना, आय.आर.डी.पी. या योजने अंतर्गत त्यांना कर्ज प्रकरणाचा देखील लाभ घेता येत नाही. तसेच वैयक्तीक आणि सार्वजनिक शौचालये देखील या भागात उभारलेली नाहीत. त्यामुळे शासकीय योजनांच्या नादी लागण्यापेक्षा स्वतः मोलमजुरी करून दिवस काढणे आणि या चक्रात होरपळणेच आमच्या नशीबी लिहिले आहे. अशी धारणा तेथील जनतेची आहे.[१०] अर्थातच स्वयंशासना अभावी अनियंत्रीत वस्त्यांची निर्मिती आणि त्यातून उदभवणाऱ्या विविध समस्या ही ग्रामीण कराडची डोकेदुखी बनली आहे. गलिच्छ वस्त्या, सामाजिक नियंत्रणाचा अभाव, नागरी सुविधांचा ठणठणाट आणि पर्यायाने निर्माण झालेली नागरिकांच्या आरोग्याची समस्या असे

दुष्टचक्र निर्माण झाले आहे. निव्वळ स्वयंशासनाच्या अभावामुळे आयुष्याची फार मोठी किंमत कराड ग्रामीणमधील जनता मोजत आहे.

## ब. झोपडपट्टी व झोपडपट्टी निर्मूलन -

झोपडपट्टी हा शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे शहराला मिळालेला शाप आहे. शहरीकरणाच्या प्रक्रियेत झोपडपट्ट्या भरपूर प्रमाणात मजुरांचा पुरवठा करतात. परंतु त्यामुळे निर्माण होणाऱ्या गलिच्छ झोपडपट्ट्या ही एक इष्टापत्ती म्हणावी लागेल. झोपडपट्ट्या या शहराच्या आरोग्यास घातक असतात. याबद्दल कोणाचेही दुमत असणार नाही. अनेक समाजशास्त्रीय विचारवंतांनी आपापल्या परीने झोपडपट्ट्यांविषयी आपली परखड मते मांडली आहेत. हल्बर्ट यांनी Urban Socioloy या ग्रंथात गलिच्छ वस्ती ही समाजात विघटन करीत असून समाजातील लोकांना अनैतिकतेकडे नेणारी ही समस्या आहे.[११] क्विन आणि थॉमस यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हटले की, "गलिच्छ वस्तीत अधिकाधिक रोगाची सुरूवात होते, रोगाचा प्रसार करणारी ही वस्ती असून संपूर्ण समाजात रोगट वातावरण करते."[१२] डेव्हीड हंटर "गलिच्छ वस्त्या किंवा झोपडपट्ट्या म्हणजे नागरी जीवनाला झालेला कॅन्सर होय."[१३] झोपडपट्ट्यांच्या बाबतीत विविध समाजशास्त्रज्ञांनी मांडलेली मते विचारात घेतली असता, झोपडपट्टी म्हणजे किती भयंकर समस्या आहे याची जाणिव होऊ शकते. कराड शहराच्या आसपास वाढलेल्या झोपडपट्ट्यांचे स्वरूप देखील यापेक्षा वेगळे मुळीच नाही. कराड ग्रामीण मध्ये विविध ठिकाणी अशा अनधिकृत व गलिच्छ वस्त्या दिसून येतात. पैकी रूक्मिणी नगर मधील झोपडपट्टी, शिवाजी स्टेडीयमच्या दक्षिणेस असणारी इदगाह, कब्रस्थान ट्रस्टच्या जागेतील झोपडपट्टी त्याच बरोबर मार्केट यार्डच्या पूर्वेस मागील भिंतीस लागून कार्वे नाका पाण्याच्या टाकीपासून कब्रस्थान पर्यंतच्या साधारण अर्धा किलोमीटरमध्ये फोफावलेली झोपडपट्टी, मुजावर कॉलनीच्या शेजारील प्रेमनगर, वेश्यावस्ती इ. भागात पाहिले असता. झोपडपट्टी किती विस्तीर्ण व मजबूत असल्याचे दिसून यते. कराड ग्रामीण मधील या अनधिकृत झोपड्या सोडाच पण

अधिकृतपणे लोकांनी विकत घेतलेल्या जागांमध्ये काही ठिकाणी ज्या वसाहती वसलेल्या आहेत. त्या अनधिकृत झोपड्यांपेक्षा कमी नाहीत. त्यामध्ये डवरी वसाहत, बारा डबऱ्यांचा इलाका, शांतीनगरच्या पूर्वेचा भाग, गार्डीकर वसाहतीच्या पूर्वेचा भाग या वसाहती लोकांनी विकत घेतलेल्या जागेवर वसलेल्या आहेत. पण त्यांनी अवस्था झोपडपट्टयांपेक्षा वेगळी नाही. रस्त्याची समस्या, पाण्याचे दुर्भिक्ष, दिवाबत्तीची गैरसोय, गटार आणि ड्रेनेज सोई अभावी घरांच्या आसपास साठणारी घाण पाण्याची डबकी, मच्छर आणि रोगजंतूचा प्रादूर्भाव, डुक्करे आणि मोकाट कुत्र्यांचे साम्राज्य यातून या झोपडपट्टयांचा चेहरा-मोहरा दिवसागणिक विद्रूप होत चालला आहे. त्यालाच या झोपडपट्टयांमध्ये अवैद्य धंद्याचा झालेला प्रस्फोट ही एक चिंतनीय बाब आहे. या भागाच्या विकासासाठी कोणतीही यंत्रणा नसल्यामुळे केवळ लोकप्रतिनिधींच्या तुटपुंज्या स्थानिक विकास निधीवर अवलंबून रहावे लागते. तेवढा निधी कराड ग्रामीणच्या विकासास पुरेसा नाही. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी उमेदवार या भागाच्या विकासाकरिता अनेक घोषणा, आश्वासने देतात. कराड ग्रामीणचा कराड शहर हद्दीमध्ये समावेश करण्याच्या वल्गना आणि पोकळ आश्वासने दिली जातात व निवडणुकीनंतर पुन्हा सर्व विसरून जातात व कराड ग्रामीणची परिस्थिती मात्र "जैसे थे" कराड ग्रामीणच्या या विदारक परिस्थितीचे वर्णन अनेक वृत्तपत्रांनी केले आहे. दैनिक पुढारीने "आपला सातारा" या पुरवणीत सलग चार दिवस क्रमशः सचित्र बातम्या प्रसारित करून देखील त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. दैनिक पुढारीने सलग चार दिवस "झोपडपट्टीवासियांच्या नरकयातना" या लेखमालेत दि. २९ जानेवारी २००७, ३० जानेवारी, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी असे चार दिवस सलग लेखमाला सादर केली. यावरून या झोपडपट्टीचे स्वरूप आणि त्यातील नरकयातनांची जाणिव होते.

झोपडपट्टयांनी कराड ग्रामीण हा विळखा घातलेला आहे हे सत्य असले तरी या झोपडपट्टयांच्या निर्मूलनासाठी मात्र काही उपाययोजना होताना दिसत नाही.

स्वयंशासनाच्या अभावामुळे या झोपडपट्टयांचे पुनर्वसन किंवा निर्मूलन करायचे कोणी हा प्रश्न आवर्जून उभा आहे. कराड शहरात असणाऱ्या पाटण कॉलनीच्या आसपास असलेल्या झोपडपट्ट्या जर वर्षी येणाऱ्या पुराच्या पाण्यामध्ये बुडतात आणि प्रचंड वित्तहानी होते. त्यामुळे त्या वसाहतींचे पुनर्वसन प्रेमनगरमध्ये करण्याचा ठराव नगरपालिकेमध्ये झालेला आहे. या व्यतिरिक्त कराड ग्रामीणमधील झोपडपट्टयांचे निर्मुलन, पुनर्वसन अजिबात झालेले नाही. किंबहुना तसा प्रयत्नदेखील झालेला नाही.

**क. दिवाबत्ती, रस्तेसफाई आणि मैला सफाईची समस्या -**

कराड ग्रामीण भागातील नागरिकांना दिवाबत्ती, रस्तेसफाई आणि मैला सफाई या गोष्टी पूर्णपणे अपरिचीत आहेत. कारण यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यकता असते ती जबाबदार स्वयंशासनाची. परंतु कोणतीही स्वयंशासन व्यवस्था या ठिकाणी उपलब्ध नसल्याने या सर्व सुविधा म्हणजे स्वप्नरंजन ठरते. कराड नगरपालिकेकडून कचरा गोळा करण्यासाठी एक दोन घंटागाडी सोडली तर कोणतीही व्यवस्था इथे नाही.

दिवाबत्तीच्या बाबतीत सांगावयाचे तर सर्वात पहिला मुद्दा म्हणजे स्ट्रीट लाईट्चे मासिक बील भरायचे कोणी? हा मुख्य प्रश्न आहे. नगरपालिकेला कराड ग्रामीण मधून कोणतेही कर मिळत नसल्याने रस्त्यावरील पथ दिव्यांचे बिल भरता येत नाही. त्यामुळे पथदिवे कोठेही दिसत नाहीत. अलिकडे मुजावर कॉलनी श्री. जगदीश जगताप यांचे स्थानिक विकास निधीतून आणि लोकवर्गणीतून या दोन ठिकाणी थोड्याफार पथदिव्यांची सोय झालेली आहे. त्याचे मासिक बील कार्वे ग्रामपंचायत भरते. अशीच किरकोळ स्वरूपाची व्यवस्था काही ठिकाणी झालेली दिसते. कराड नगरपरिषदेकडून मात्र कोणत्याही प्रकारच्या पथदिव्यांची सोय केलेली नाही. वास्तविक पाहता अशा हद्दीलगतच्या भागांच्या विकासाची जबाबदारी त्या नगरपालिकेची असते. पंरतु दिवाबत्तीच्या बाबतीत कराड नगरपालिकेची भूमिका तशी दिसत नाही. गांढूळखत

प्रकल्प परिसरात व ऑक्सिडेशन पॉडस परिसरातील दिवाबत्ती ही त्यांच्या फायद्यासाठीच उपयोगी पडते.

रस्ते सफाईच्या बाबतीतदेखील काही वेगळी परिस्थिती नाही. कराड ग्रामीणच्या रस्त्यांवर फिरताना हे स्पष्ट जाणवते. रस्त्याकडेला किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा कुंड्या नाहीत किंवा रस्ते सफाईची कोणतीही यंत्रणा नसल्यामुळे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे दिसतात. कचरा गटरामध्ये साचून गटारे बारमाही तुंबलेली आहेत. अशा तुंबलेल्या गटारांच्या सफाईची कोणतीच सोय नसल्यामुळे गटारांमधून कायमस्वरूपी दुर्गंधी आणि रोगजंतूचा फैलाव होताना दिसतो. जे काही गटर्स बांधलेले आहेत ते शेवटपर्यंत पूर्ण झालेले नाहीत. त्यामुळे त्या गटर्स मधून वाहणाऱ्या पाण्याचे पुढे तळेच्या तळे साचतात. त्यातून डास, माशांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे.

कराड ग्रामीण भागातील स्वच्छता, साफसफाईच्या बाबतीत दि.२९/१/२००७ च्या दैनिक पुढारीच्या अंकात प्रसिद्ध झालेली बातमी अधिक बोलकी आहे. शहर स्वच्छ करण्याच्या नादात शहरातील घाण कचरा ज्या ठिकाणी टाकला जाते त्या ठिकाणी राहणाऱ्या गोरगरीब जनतेच्या आरोग्याकडे मात्र कराड नगरपालिकेने सोईस्कर दुर्लक्ष केलेले आहे. गांडूळ खत प्रकल्पासाठी कराड शहरातून गोळा केलेल्या कचऱ्याचे ढिगच्या ढिग या परिसरात टाकलेले आहेत. त्यामुळे तेथील वातावरण दूषित बनले आहे. वाऱ्यामुळे परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरते.

परिसरात घोंगावणाऱ्या माशा तर दिवसाप्रमाणे रात्रीपण खायला उठतात. डासांचे तर मोठ्या प्रमाणात साम्राज्य आहे. त्याचप्रमाणे दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे परिसरात साथीच्या रोगांचा फैलाव आहे. उलट्टया, जुलाब अशा साथीच्या रोगांना लहान मुले व महिलांना सामोरे जावे लागते. पावसाळ्यात तर मोठ्या प्रमाणात येणारे ड्रेनेजचे पाणी सरळ घरात देखील घुसते. तसेच ज्या घरासमोर कचरा मोठ्या प्रमाणात आहे त्या झोपड्यात व इतरत्र कचऱ्यातून निचरा झालेले पाणी थेट घरात घुसते.[१४] या

वृत्तपत्रातील बातमीवरून कराड ग्रामीण मधील साफ सफाईच्या व्यवस्थेची जाणीव होते. या परिसराच्या साफसफाईकरिता कराड नगरपरिषद व पंचायत समिती, जिल्हा परिषद किंवा महाराष्ट्र शासन कोणतेही नियमित प्रयत्न करताना दिसत नाही. त्यामुळे जनजीवन अधिक असुरक्षीत बनले आहे.

मैला सफाई समस्येबाबत काही वेगळे चित्र दिसत नाही. कराड ग्रामीणच्या परिसरात विविध लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून काही प्रमाणात गटारे बांधण्यात आली आहेत. त्याचा उल्लेख या प्रकरणाच्या शेवटी केलेलाच आहे. पंरतु तेवढी गटारे पुरेशी नाहीत. कराड शहरात मात्र मैला सफाईची उत्कृष्ठ सोय आहे. तेथे भुयारी गटर योजना नगरपालिकेने राबवली आहे. १९६५ साली मा. पी. डी. पाटील यांनी आपल्या कर्तृत्वाच्या आधारे महाराष्ट्रातील मोठमोठ्या शहरांना जे जमले नाही ते प्रत्यक्षात भुयारी गटर योजना आंमलात आणून करून दाखवले. १९६५ साली ५५,००,०००/- रू. खर्चाची भुयारी गटार योजना हाती घेऊन ३-४ वर्षात पूरी केली व शहरातील सर्व सार्वजनिक व खाजगी संडास आणि मोऱ्या या भुयारी गटर योजनेस जोडण्यात आल्या.[१५]

कराड ग्रामीणमध्ये मात्र माल वाहतूकीची कोणतीच सोय नाही. तसेच अंडरग्राऊंड भुयारी गटर्सची देखील सोय नाही. तसेच पुरेशा प्रमाणात गटर्सदेखील बांधलेले नाहीत. त्यामुळे या परिसरातील मैला, सांडपाण्याच्या व्यवस्थापनाचा अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. घरे बांधताना, कोणाचीही परवानगी न घेता लोक घरे बांधतात व संडासकरिता सेप्टीक टँक बांधतात व या टाक्यातून बाहेर पडणारा मैला व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी छोटासा शोषखड्डा काढतात व त्या खड्डयामध्ये पाणी जिरवितात व जेथे गटर्स आहेत त्या ठिकाणी गटर्समध्ये सोडतात अशाप्रकारे वैयक्तिक पातळीवरील सांडपाणी आणि मैला यांची विल्हेवाट लावली जाते.

## ड. पाणी पुरवण्याची समस्या -

कराड ग्रामीण मधील पाणी पुरवठ्याची समस्या मात्र इतर समस्यांच्या तुलनेत म्हणावी तेवढी गंभीर असलेली दिसत नाही आणि भविष्यकाळात ही समस्या कराड ग्रामीण मध्ये असणारच नाही. अशा पद्धतीचे वातावरण सद्या कराड ग्रामीणमध्ये आहे. तरीसुद्धा पाणी पुरवठ्याची समस्या कराड ग्रामीणमध्ये आहे हे मान्यच करावे लागेल. पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय मानवी अस्तित्वाची संकल्पना होवूच शकत नाही. माणसाला दररोज किती पाण्याची आवश्यकता असते याचे निश्चित असे परिमाण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. १३५ लिटर/माणसी/दिवशी १६ एवढया पाण्याची गरज मानवाला असते. परंतु तेवढ्या प्रमाणात पाणी मात्र कराड ग्रामीणमध्ये आज उपलब्ध नाही. कराड शहरासाठी सन १९९०-९२ चे दरम्यान सन २०१५ सालचे प्रकल्पीत टप्पा गृहीत धरून पाणी पुरवठा योजना राबवणेत आलेली होती. मात्र कराड शहरालगतच्या झपाट्याने होत असलेला विकास विचारात घेतल्यास सद्याच्या पाणी पुरवठ्याच्या सोई अपुऱ्या पडतात. कराड शहरालगतचा त्रिशंकू भाग नगरपरिषदेमध्ये समाविष्ट करणेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून या भागातील नागरिकांना पाणी पुरवठा करणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहते.[१७] आज कराड ग्रामीणमध्ये कराड नगरपरिषदेने पाणी पुरवठा करण्याच्या प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो. परंतु पाणी पुरवठ्याच्या योजनेची क्षमता पुरेशी नसल्यामुळे संपूर्ण कराड ग्रामीणला पुरेल एवढे पुरेसे आणि योग्य प्रामणात व योग्य दाबाने पाणी पुरवठा करणे केवळ अशक्य बनले आहे. परिणामी कराड ग्रामीण मधील बराचसा भाग नळपाणी योजनेपासून वंचित आहे. तरीसुद्धा लोकांनी आपल्या स्वखर्चाने बोअरवेल्स काढून पाण्याची कमतरता दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. नगरपालिकेचा पाणी पुरवठा एवढ्या कमी दाबाने व कमी प्रमाणात होतो की लोकांना जमिनीपासून १ फूट उंचीवर असलेल्या नळातून सुद्धा पाणी मिळणे अशक्य होते. परिणामी लोकांनी नळाच्या खाली दोन ते तीन फूट खड्डे काढून त्यात नळ घेतले आहेत. तरी सुद्धा पुरेसा

पाणी पुरवठा होत नाही. अर्थात पाण्याची समस्या कराड ग्रामीणमध्ये आहे याबद्दल दुमत नाही.

कराड ग्रामीणमध्ये नगर पालिकेकडून जो पाणीपुरवठा होतो तो पुरेसा होत नाहीच. परंतु त्या मोबदल्यात नगरपालिका मात्र भरमसाठ पाणीपट्टी वसूल करते. ती पाणीपट्टी भरणे केवळ अशक्य होऊन बसले आहे.

कराड नगरपालिकेची विशेष सभा ठराव क्रमांक ७/११६ दि. २४/२/२००५ रोजी झाली. त्यानुसार दि. १/४/२००५ पासून कराड शहर व त्रिशंकू भागातील पाणीपट्टी कराचे सुधारीत दर ठरविणेत आले व दि. १/४/२००५ पासून हे दर आंमलात आले. त्यानुसार कराड शहरात घरगुती नळ कनेक्शन व वार्षिक दर रू. ९६०/- एवढा आहे तर कराड ग्रामीण साठी तेवढ्याच कनेक्शनसाठी रू. २२२०/- मोजावे लागतात.[१८] म्हणजेच कराड शहरापेक्षा साधारण सव्वादोन ते अडीच पट अधिक पाणीपट्टी कर कराड ग्रामीणच्या नागरिकांना भरावा लागतो. परंतु त्या तुलनेत पाण्याचा पुरवठा मात्र अपुऱ्या प्रमाणात होताना दिसतो. अशा प्रकारच्या पाण्याची समस्या कराड ग्रामीणमध्ये अस्तित्वात आहे.

पाणी पुरवठ्याची ही समस्या असली तरी या समस्येवर उपाययोजना करणेसाठी कराड नगरपालिकेने प्रयत्न केले आहेत. केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे या प्रकल्पाच्या अंतर्गत कराड नगरपरिषदेने कराड शहरासाठी व नव्याने समाविष्ट होऊ घातलेल्या त्रिशंकू भागासह सुधारीत पाणी पुरवठा योजना राबविणेचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यानुसार २०४० सालची कराडची ७६,८५३ एवढी व कराड ग्रामीणची ६३,६३४ एवढी लोकसंख्या गृहीत धरून नवीन पाणी पुरवठा योजनेची आखणी केली आहे. त्यानुसार १३५ लिटर/माणसी/दिवशी एवढे पाणी उपलब्ध होणार आहे. २६.६० दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होईल.[१९] अशी नवीन सुधारीत योजना पूर्ण झाल्यानंतर कराड ग्रामीणमध्ये

पाण्याची समस्या दूर होईल. सोबत नवीन सुधारीत नळ पाणी योजनेचा नकाशा व माहिती दिलेली आहे.

**इ. शालेय शिक्षणाची समस्या -**

अन्न, वस्त्र, निवारा या जरी मानवाच्या मूलभूत गरजा असल्यातरी लैंगीक गरजा, आरोग्य आणि शैक्षणिक गरजांदेखील तेवढ्याच तोलामोलाच्या असल्याचे आधुनिक काळात स्पष्ट झाले आहे. किंबहुना या तीनही देखील मानवराच्या मुलभूत गरजा मानल्या पाहिजेत. त्यापैकी शिक्षण ही मानवाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. आणि अशी शैक्षणिक गरज भागविण्यासाठी कराड ग्रामीणमध्ये कोणतीच परिपूर्ण सुविधा नाही. मुजावर कॉलनी, शरद नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व त्या शाळे अंतर्गत असणाऱ्या दोन महात्मा फुले शिक्षण हमी योजनेचे दोन वर्ग तसेच बालवाडी एवढी सुविधा सोडल्यास कराड ग्रामीणमध्ये फार मोठ्या प्रमाणात शैक्षणिक समस्या उभी असल्याचे दिसते. शरदनगर येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत आणि त्यातील विद्यार्थी यांचे समीकरण व्यस्त प्रमाणात आहे. त्यामुळे शाळा दोन शिफ्टमध्ये चालवावी लागते. अलिकडे या शाळेची इमारत दोन मजली करण्यात आलेली आहे. कराड ग्रामीणमधील सर्व विद्यार्थ्यांना कराड शहरामध्ये असलेल्या शाळामध्येच प्रवेश घ्यावा लागतो. या सर्व शाळा कराड ग्रामीणपासून साधारण १ ते २ कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट होते. कराड ग्रामीणमध्ये शासकीय अनुदानावर चालणाऱ्या शाळा, महाविद्यालये, उपलब्ध नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांना कराड शहरात अथवा मलकापूर, विद्यानगर, सैदापूर येथील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. या शाळा, महाविद्यालयांमध्ये जाण्यासाठी कोणतीच अधिकृत वाहतूक सेवा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पायी जावे लागते. काही मध्यमवर्गीय व सधन विद्यार्थी मात्र रिक्षा, टेंपो, विद्यार्थी वाहतुकीच्या वाहनातून प्रवास करताना दिसतात. झोपडपट्टीतील मुलांसाठी येथे आंगणवाडी आहे. या आंगणवाडीतील ३५ मुले या वातावरणामुळे वारंवार आजारी पडतात.[२०] माध्यमिक, उच्च माध्यमिक महाविद्यालये,

कला, वाणिज्य, शास्त्र इ. विषय शाखा, महिला महाविद्यालये, संगणक प्रशिक्षण संस्था, आय.टी.आय., वैद्यकिय महाविद्यालये, तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था अशा कोणत्याही शिक्षण देणाऱ्या संस्था या परिसरामध्ये उपलब्ध नाहीत. भरमसाट फी घेऊन संगणक प्रशिक्षण देणारी एखादी खाजगी संस्था सोडल्यास शिक्षणाच्या बाबतीत फार मोठे दुर्भिक्ष कराड ग्रामीणमध्ये जाणवते.

**फ. रस्ते बांधणी, अंतर्गत रस्ते बांधणी, गटार यांची समस्या -**

रस्ते किंवा मार्ग ही शहरातील अत्यंत महत्त्वाची बाब होय. रस्ते हे शहररूपी शरीरातील रक्तवाहिन्या असतात. रस्ते जेवढे वाहतूकीस योग्य असतील तेवढा त्या शहराचा चेहरामोहरा सुंदर असतो. रस्ते किंवा सडका या शहरातील मानवी जीवनास अत्यंत पोषक घटक आहेत. शहरांची वाढ, विकास व विस्तार काहीसा त्या भागातील रस्त्यांवर अवंलबून असतो. दळणवळणाच्या मार्गांचा शहर स्थानावर बराच प्रभाव पडतो. महाड, संगमेश्वर, भोपाळ, अशा शहरांचा उदगम या प्रकारचा आहे.[२१] कराड शहराच्या बाबतीत काही अंशी हे तत्व उपयोगी पडते. कराड शहर हे दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय सोईस्कर आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४, रेल्वेमार्ग, हवाईमार्ग, राज्य महामार्ग अशा सर्व प्रकारच्या मार्गांनी युक्त असे हे शहर आहे. परंतु कराड ग्रामीणच्या बाबतीत हे सर्व घटक अपरिचीत आहेत. या परिसरामध्ये रस्त्यांची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. वस्त्यांची वाढ होत असताना किंवा उपनगरे वसत असताना विशिष्ट रूंदीचे रस्ते, चौक घरासमोर व मागील बाजूस ठराविक जागा सोडणे असा कोणताही प्रकार इथे दिसत नाही. किंबहुना पूर्व नियोजित रस्ते निर्माण करणारी कोणतीही शासकीय यंत्रणा या ठिकाणी अस्तित्वात नाही. वस्त्या, वसाहती निर्माण होत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या लोकांनी ५ ते ६ फूट जागा सोडून घरे बांधली. त्यामुळे साधारण दहा ते वीस फूट रूंदीचे रस्ते निर्माण झाले आहेत. काही मोजक्या वसाहतींमध्ये पूर्व नियोजित रस्ते दिसून येतात. बनपुरीकर कॉलनी, शिवाजी हौसिंग सोसायटी, रूक्मिणी नगर, गार्डन, पी.डी.पाटील नगर वगैरे काही मोजक्या

ठिकाणी पूर्व नियोजित रस्ते असलेल्या कॉलन्या उभ्या आहेत. अशा कॉलन्यांमध्ये दुतर्फा गटर्स सुद्धा दिसतात. परंतु मुजावर कॉलनी, शांतीनगर, प्रेमनगर, डवरी वस्ती, सुर्यवंशी मळा, घोरपडे पथ, बारा डबरी परिसर या ठिकाणच्या रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. रस्त्यांची बांधणी किंवा नियोजन पूर्व नियोजित नसल्यामुळे रस्ते बांधणी ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. आणि अशा लोकांमार्फत निर्माण झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती, खडीकरण, डांबरीकरण, अल्पप्रमाणात लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून चालू आहे. परंतु लोकप्रतिनिधींचा स्थानिक विकास निधी, जिल्हा परिषद मार्फत होणारी रस्त्यांची कामे पुरेशी नाहीत त्यामुळे रूंद, भव्य रस्ते, चौक, आयलँड अशा गोष्टी कराड ग्रामीणमध्ये पहायला मिळत नाहीत. रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरणाची माहिती या प्रबंधात दिलेली आहे.

कराड ग्रामीणमधील गटारांची अवस्था अत्यंत भयावह आहे. पूर्वीच परिसरात गटारेच नव्हती. परंतु कालांतराने विविध योजना आणि प्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून या ठिकाणी गटारे निर्माण झाली आहेत. भुयारी गटर योजना तर इथे आली त्यात गय नाही. जी गटारे बांधली आहेत त्यांचा दर्जा  हलक्या स्वरूपाचा असल्यामुळे काही ठिकाणी गटारे बांधल्यानंतर महिन्याभरात ती ढासळलेचे चित्र दिसते. तसेच या गटारांची दुरूस्ती आणि नियमित स्वच्छतेची कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे येथील गटारे म्हणजे नरकच बनले आहे व अशा नाल्याभोवती असणाऱ्या झोपडपट्ट्या म्हणजे नरकयातना होय. अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते.

मुजावर कॉलनी, पोस्टल कॉलनी, ज्ञानेश्वर गृहसंस्थेच्या परिसरात असणाऱ्या गटाराभोवती मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे. या गटाराभोवती वाढलेल्या गवताने नाला पूर्णपणे मुजला आहे. परिणामतः या गवतात खेळणारी लहान मुले या गटारानजिक गेल्यास अपघात होण्याची शक्यताही आहे. तसेच या गटारामध्ये झोपडपट्टीतील मुले शौचास बसतात. परिणामतः कराड ग्रामीणच्या झोपडपट्ट्यांना

स्वच्छतेच्या बाबतीत देखील प्रबोधन होणे गरजेचे आहे.[२२] जी थोड्या फार प्रमाणात गटारे, नाले बांधलेली आहेत. त्यांचे नियोजन कोणतेही नाही. निधी जसजसा उपलब्ध होईल तसतशी गटारे बांधली जातात. शेवटी गटारांचे पाणी कुठून काढावयाचे याबाबतीत कसलेही नियोजन नसलेमुळे गटार ज्या ठिकाणी संपतो त्या ठिकाणी घाण पाण्याचे तळे निर्माण होते. घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य स्थापन होते. या परिसरामध्ये विविध योजना आणि स्थानिक विकासनिधीतून बांधलेल्या गटारांची माहिती या प्रकरणाच्या शेवटी दिलेली आहे.

येणाऱ्या काही वर्षामध्ये मात्र हे चित्र बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. किंबहुना तसा प्रयत्न कराड नगरपरिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालू आहे. केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास योजनेअंतर्गत कऱ्हाड शहर व त्रिशंकू भागासाठी अद्ययावत पाणीपुरवठा व भुयारी गटार योजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठीचे सर्वेक्षण महाराष्ट्र प्राधिकरण विभागामार्फत करण्यात येणार आहे. सुमारे ५० कोटी रूपये खर्चाची ही योजना असून २०४० रोजीची भविष्यातील शहर व परिसरातील लोकसंख्या लक्षात घेऊन ती आखण्यात आलेली आहे.[२३] नगरपालिकेने केलेला हा ठराव कराड ग्रामीणमधील जनतेला जगण्याच्या दृष्टीने आशावाद निर्माण करणारा ठरेल. भविष्यकाळात थोड्या फार प्रमाणात का होईना पण कराड ग्रामीणमध्ये गटर्स, नाले, भुयारी गटारे निर्माण होऊन नागरिकांच्या हाल अपेष्टांमध्ये फरक पडेल असे वाटते.

### ग. ट्रान्सपोर्ट, बसेस, रिक्षा इ. -

शहरातील अंतर्गत प्रवासी वाहतूक आणि माल वाहतूक हे एक मोठे आव्हान शहरी प्रशासनावर असते. शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कामगारांची आणि सेवकांची ने आण सुरक्षितपणे झाल्यास शहराच्या उत्पन्नात भर पडते. शहराची किंबहुना शहरी प्रशासनाची अनेक कार्ये असतात. त्यामध्ये संरक्षण, शासकीय व राजकीय कार्ये,

व्यापार विनिमय कार्ये, औद्योगिक कार्ये, मार्गांचे केंद्रीभवन, क्रीडा व आरोग्यवर्धक कार्य, धार्मिक व सांस्कृतिक कार्य.[२४] इ. कार्ये शहरी प्रशासनाला करावी लागतात. या सर्व कार्याची पूर्तता करताना जनतेच्या आणि माल वाहतुकीला पर्याय नसतो. त्यासाठी आवश्यक असतात सरकारी आणि माल वाहतूक सेवा, प्रवासी वाहतुकीकरिता सरकारी सेवा उपलब्ध असल्यास अगदी वेळेवर व योग्य मोबदल्यात प्रवासी वाहतूक होते. ते लोकांना परवडते आणि त्याचे result देखील त्वरीत मिळतात. माल वाहतुकीच्या बाबतीत देखील तोच अनुभव आहे. ट्रान्स्पोर्टेशन, बसेस, रिक्षा इ. संदर्भात कराड ग्रामीणचा अभ्यास करत असताना या सर्व संकल्पना फोल ठरतात. कारण कराड ग्रामीणमध्ये प्रवासी वाहतुकीची किंवा माल वाहतुकीची अधिकृत शासकीय सेवा उपलब्ध नाही. हा परिसर कराड शहराला अगदी खेटून असल्याने एस.टी. महामंडळाने प्रवासी वाहतुकीची सोय केलेली नाही. अपवाद म्हणून स्टँड ते वाखाण रस्ता अशी एक बस सुरू केलेली होती. परंतु ती बस सेवा देखील कालांतराने बंद पडली अर्थात प्रवासी वाहतुकीकरिता कोणतीही बस व्यवस्था उपलब्ध नाही. नगरपरिषदेकडे तर ट्रान्स्पोर्ट खातेच नसल्यामुळे कराड नगरपरिषदेमार्फत अंतर्गत प्रवास वाहतुकीचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

मालवाहतुकीच्या संदर्भात बोलायचे झाल्यास कराड ग्रामीणमध्ये कोणतेही आणि कसलेही औद्योगिकरण, व्यापार पेठा, बाजार अशी कोणतीच व्यवस्था अस्तित्वात नसल्यामुळे माल वाहतुकीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. लहान-सहान दुकाने, घर बांधणीचे साहित्य इ. वाहतूक ही खाजगी लहान टेंपो किंवा ट्रॅक्टरच्या माध्यमातून होते. रस्ते अतिशय लहान आणि चिंचोळे असल्यामुळे ट्रकसारख्या मोठ्या वाहनोन होणारी वाहतूक विरळच आहे.

कराड ग्रामीणमधील रस्ते अतिशय लहान, गल्लीबोळातून जाणारे व अतिशय दुरावस्थेत असल्यामुळे तीन आसनी व सहा आसनी रिक्षा तसेच मालवाहतुकीच्या तीन चाकी रिक्षा, ट्रॅक्टर व तत्सम छोटी छोटी वाहनेच या ठिकाणी चालू शकतात.

रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे रिक्षावाल्यांना देखील प्रवासी वाहतूक परवडत नसल्याने भरमसाठ भाडे वसुली होतानाचे चित्र सर्रास दिसते. शहरांमध्ये अनेक प्रकारचे व्यवसाय करून लोक आपली गुजराण करतात. या पार्श्वभूमीवर शहरी व्यवसायाची प्राथमिक, व्दितीयक व तृतीयक अशा दलात वर्गवारी करता येते.[२५] कराड ग्रामीण परिसरातील लोक व्दितीयक स्वरूपाच्या व्यवसायामध्येच अधिक प्रमाणात सहभागी आहेत आणि त्यासाठी लागणारी मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूकीची कोणतीही अधिकृत सेवा उपलब्ध नसल्याने या परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय होताना दिसते.

## इ. टाऊन प्लॅनिंग, बांधकाम नियंत्रण इ. -

कराड ग्रामीणच्या टाऊन प्लॅनिंग व बांधकाम नियंत्रणाचा अभ्यास करताना त्याची पार्श्वभूमी थोडक्यात पाहणे आवश्यक ठरते. ही टाऊन प्लॅनिंगची प्रक्रिया कराड शहरांतर्गत झालेली होती. टाऊन प्लॅनिंग स्कीमच्या हद्दीनुसार शहराच्या हद्द वाढीचे काम नगर पालिकेने जा. नं. १४०० ता. २६/११/१९६५ सरकारकडे पाठविले त्यानुसार सरकारी ठराव लो.ग.व.प. हे डि नं. (३) ई. ता. १५/५/१९५६ आर.सी.एन. २७५६ मंजुरी मिळाली. त्यानंतर १९६४ साली टाऊन इंप्रुव्हमेंट चेअरमन म्हणून बाबूराव थोरवडे यांची नेमणूक झाली[२६] व त्यानुसार कराड शहरांतर्गत टाऊन प्लॅनिंग आणि बांधकाम नियंत्रणाचे कामकाज सुरू झाले व एफ.एस.आय. निश्चित झाला. परंतु कराड ग्रामीणमध्ये मात्र या संकल्पना स्वप्तवत वाटतात. कराड ग्रामीणमध्ये टाऊन प्लॅनींग आणि बांधकाम नियंत्रण करायचे कुणी? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अकृषक किंवा बिगर शेतीचा भाग अतिशय कमी प्रमाणात आहे. ज्या काही पूर्वनियोजित कॉलन्या आहेत त्या ठिकाणी बिगर शेती प्लॉटस आहेत. त्यावर बांधकाम करण्यासाठी नगर रचना कार्यालय (टी. पी. ऑफीस) सातारा यांची परवानगी व मार्गदशन व आदेशानुसार बांधकाम करावे लागते. तेवढ्याच ठिकाणच्या बांधकामावर टी.पी.चे नियंत्रण आहे. बाकीची उरलेली जमीन ही कृषक किंवा शेतीची असा उल्लेख

असल्याने टी.पी. च्या नियंत्रणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे कराड ग्रामीणमधील बांधकामावर कोणाचेही कसलेही नियंत्रण नाही.

ज्याला घर बांधावयाचे आहे तो गुंठेवारीनुसार जमिनीचा तुकडा घेतो. कोणाच्याही परवानगी शिवाय स्वतः जसे सुचेल तसे बांधकाम करतो. त्यातूनच ओंगळ आणि बकाल वस्त्यांचे साम्राज्य निर्माण होते. बांधलेल्या घरांवर कोणताही कर किंवा घरपट्टी आकारलेली नाही. तसेच बांधलेल्या बांधकामाची ७/१२ च्या उताऱ्यावर नोंदसुद्धा होत नाही. ज्यांनी प्लॉटस् बिगरशेती करून व टाऊन प्लॅनिंगच्या परवानगीने घरे बांधली आहेत. तेच फक्त घरपट्टी भरतात. अन्यथा इतर बांधकामांना कसलीही परवानगी आणि कर किंवा घरपट्टी नाही. पर्यायाने या परिसरातील नागरिकांच्या प्रचंड हाल अपेष्टा होतात. कर्ज प्रकरणे,मॉर्गेज, गहणवट या सर्व व्यवहारामध्ये अनेक अडचणी येतात व अशा प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी नको तेवढा खर्च करावा लागतो.

कराड ग्रामीणच्या परिसरातील बांधकामावर कोणाचेच नियंत्रण नसल्यामुळे अनियंत्रित बजबजलेल्या बकाल आणि झोपडपट्टी सदृश्य गैरसोईंनी माखलेल्या वस्त्या वसाहतींची गजबजपुरी निर्माण झाल्याचे चित्र कराड ग्रामीणमध्ये दिसते.

शहरीकरण आणि नागरीकरण यामुळे कराड ग्रामीण भागामध्ये अनेक समस्या कशा निर्माण झाल्या आहेत याचे विवेचन या प्रकरणामध्ये केले आहे. हा भू-प्रदेश कराड तालुक्याचा ग्रामीण भाग आणि कराड शहर यांच्यामध्ये गेल्या २० वर्षामध्ये जो आर्थिक विकास झाला. यामुळे निर्माण झालेला आहे. या भागाकडे स्थानिक सभा, स्वयंसेवी संस्थेच्या वेगवेगळ्या संस्थानी दुर्लक्ष केल्यामुळे मोठया प्रमाणात नागरी समस्या निर्माण झाल्या आहेत. हा प्रश्न केवळ कराड ग्रामीणचाच नसून महाराष्ट्रातील अनेक शहरांचा विस्तारीत भागामध्ये अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यासंबंधी कराड ग्रामीण भागामध्ये तीन विचार प्रवाह -

पहिला विचारप्रवाह - कराड ग्रामीण भागाचा कराड नगरपरिषदमध्ये समाविष्ट करावा असे सांगणारा एक विचार प्रवाह.

दुसरा विचारप्रवाह - कराड ग्रामीण भागामध्ये स्वतंत्र नगरपालिका स्थापन करावी असे मत मांडणारा आहे.

तीसरा विचारप्रवाह - मलकापूर ग्रामपंचायतीचा आहे. त्यामध्ये कराड ग्रामीण भागातील तीन आणि उत्पन्न देणारा भाग कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट होऊ नये. तो ग्रामपंचायतीमध्ये रहावा.

अशा प्रकारे कराड ग्रामीणच्या भवितव्याबद्दल जो संघर्ष निर्माण झाला आहे. त्यामागील राजकारण आणि स्थानिक प्रशासनाच्या समस्यांची चर्चा पुढच्या प्रकरणात करीत आहे.

## संदर्भ


१. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. ३०/१/२००७, पृ. ३.

२. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. १.

३. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. ३०/१/२००७, पृ. १.

४. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. १.

५. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. १.

६. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. १.

७. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. २.

८. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ.१-३.

९. मलकापूर नगरपंचायतीचे घोषणेवर कराड नगरपरिषदेची हरकत, पृ. २.

१०. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. ३०/१/२००७, पृ. ३.

११. वैद्य वसंत - भारतीय सामाजिक समस्या, पृ. २२.

१२. वैद्य वसंत - भारतीय सामाजिक समस्या, पृ. २२.

१३. घारपुरे विठ्ठल - सामाजिक व सांस्कृतिक भूगोल, पृ. ११३.

१४. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. ३०/१/२००७, पृ. १.

१५. पाटील राजश्री दिलीप - कराड नगरपालिकेचा इतिहास, १८५५-१९९३, पृ.१०६-१०७.

१६. सुधारीत कराड (त्रिशंकू भागासह) नळ पाणी पुरवठा योजना, सुधारित योजनेची माहिती दर्शवणारी टिप्पणी, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, पृ. ३.

१७. सुधारीत कराड (त्रिशंकू भागासह) नळ पाणी पुरवठा योजना, सुधारित योजनेची माहिती दर्शवणारी टिप्पणी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पृ. १.

१८. दैनिक पुढारी - कराड नगरपरिषद कराड जाहीर सूचना, दि. २६/२/२००७, पृ. ४.

१९. सुधारीत कराड (त्रिशंकू भागासह) नळ पाणी पुरवठा योजना, सुधारित योजनेची माहिती दर्शवणारी टिप्पणी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कराड, पृ.३.

२०. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. २९/१/२००७, पृ. ३.

२१. देशपांडे चं. धु. - शहरे, पृ. ३३.

२२. दैनिक पुढारी, आपला सातारा, दि. ३०/१/२००७, पृ. ३.

२३. दैनिक सकाळ, दि. १७/२/२००७, पृ. ४.

२४. देशपांडे चं. धु. - शहरे, पृ. १५-२३.

२५. देशपांडे चं. धु. - शहरे, पृ. ४७.

२६. पाटील राजश्री दिलीप - कराड नगरपालिकेचा इतिहास, १८५५-१९९३, पृ.६६.